**न्यायालयीन प्रकरण**

अ.शा.पत्र क्र.SMP २०१०/प्र.क्र.३२२/का.३
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, ३ मजला,
मंत्रालय, मुंबई-३०० ०३२
दिनांक :- २८ मार्च, २०११.

वन्दना कृष्णा
प्रधान सचिव

विषय :- बाल न्याय कायद्याखाली विविध शासकीय बाल कल्याण समित्यांवर चांगल्या व्यक्तींची निवड.

प्रिय

शासनाच्या महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्य सल्लागार मंडळ, जिल्हा सल्लागार मंडळ, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ अशा समित्या व मंडळांवर बाल विकास क्षेत्रातील व्यक्तींची अशासकीय संदस्य म्हणून नियुक्ती केली जाते. सदर समित्या व मंडळ यांची कार्य व रचना याबाबत टिप्पणी सोबत जोडली आहे.

२. सदर समित्या व मंडळे निराश्रित, बेघर, अनाथ, संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना संस्थेत प्रवेश देणे,बालगृहांचे पर्यवेक्षण व बालकांच्या पुनर्वसनासंदर्भात शासनास सल्ला देणे, अशा महत्त्वाच्या व संवेदनशील बाबींशी निगडीत असल्याने, सदर मंडळ व समित्यांवर सुयोग्य व्यक्तींची निवड करणे अत्यावश्यक आहे. मा.उच्च न्यायालयाने सुध्दा सुमोटो याचिका क्र.१८२/२०१० मध्ये या मंडळ व समित्यांवर संवेदनशील व आवश्यक पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्याकरिता निर्देश दिलेले आहेत.

18366

Home

३. याकरिता आपण प्रसिध्दी पत्रकाद्वारे (Press note) आपल्या जिल्हयातील इच्छूक व्यक्तीस सदर समित्या / मंडळांवर मानधनी नियुक्तीकरिता आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.३०.०४.२०११ पर्यत अर्ज करण्याबाबत आवाहन करावे. सदर प्रसिध्दी पत्रक (Press note) मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात जाहीर करावे व इतर मार्गानेही या बाबीला प्रसिध्दी द्यावी. आपण आपल्या जिल्हयातील प्राप्त अर्ज स्वीकारुन व सदर अर्जाची छानती करुन सर्व संकलित अर्ज शासनास पाठवावेत. तसेच सदर प्राप्त अर्जातील १० सर्वात योग्य उमेदवारांची शिफारस यादी व इतर उमेदवारांची प्रतिक्षा यादी शासनास दि.१५ मे, २०११ पर्यंत सादर करावी.

7/4/1

आपली,

(स्वाक्षरी)

( वन्दना कृष्णा )

श्री. अन्बलगन्
जिल्हाधिकारी, अहमदनगर
जिल्हा - अहमदनगर

प्रत,
आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी पाठपुरावा करुन सदर माहिती संकलित करावी.

## जिल्हयाधिका-यांनी आपल्या जिल्हयाच्या संकेतस्थळावर (Web Site ) वर ठेवावयाची माहिती

### बाल विकास क्षेत्रात विविध शासकीय समित्यांवर सदस्य आवश्यक.

शासनाच्या महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० नुसार स्थापन करण्यात आलेल्या राज्य सल्लागार मंडळ, जिल्हा सल्लागार मंडळ, बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ अशा व इतर समित्या व मंडळांवर बाल विकास क्षेत्रातील कार्यकर्त्यांची अशासकीय सदस्य म्हणून आवश्यकता आहे.

सदर मंडळ / समित्यांची कार्य व रचना खालीलप्रमाणे आहे :-

**(१) राज्य सल्लागार मंडळ**

राज्य सल्लागार मंडळ, बालगृहांची स्थापना आणि त्यांचे परिरक्षण करणे, साधनसंपत्ती उभारणे, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकाचे आणि विधिसंघर्षग्रस्त बालांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन या सुविधा पुरविणे आणि संबंधित विविध शासकीय व अशासकीय अभिकरणांमध्ये समन्वय साधणे इत्यादीशी संबंधित बाबींवर शासनाला सल्ला देईल.

राज्य सल्लागार मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| (१) उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त सचिव | - अध्यक्ष |
| (२) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग | - सदस्य |
| (३) आरोग्य महासंचालक किंवा त्याचा प्रतिनिधी | - सदस्य |
| (४) संचालक, शालेय शिक्षण किंवा त्यांचा प्रतिनिधी | - सदस्य |
| (५) पोलीस उप महानिरिक्षक (महिलांवरील अत्याचार प्रतिबंध) किंवा त्यांचा प्रतिनिधी | - सदस्य |
| **(६) बाल विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या विख्यात स्वयंसेवी संघटनांचे दोन प्रतिनिधी.** | **-सदस्य(अशासकीय सदस्य)** |
| **(७) शैक्षणिक संस्थेचे किंवा विद्यापीठाचे प्रतिनिधी.** | **-सदस्य (अशासकीय सदस्य)** |
| **(८) निगम निकाय (कॉर्पोरेट) क्षेत्रातील प्रतिनिधी** | **- सदस्य(अशासकीय सदस्य)** |
| **(९) आरोग्य, बालमानसशास्त्र इत्यादी क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती** | **-सदस्य(अशासकीय सदस्य)** |
| (१०)आयुक्त, महिला व बाल विकास | - सदस्य सचिव |

**(२) जिल्हा सल्लागार मंडळ**

बाल न्याय कायद्यांतर्गत बालकांसाठी कार्यरत शासकीय व स्वंयसेवी संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेणे, सदर बालकांच्या संस्थांना भेटी देणे व संस्थांच्या सुधारणा व विकासासाठी राज्य शासनास सल्ला देणे, तपासणीच्या वेळी मुलांशी परस्पर संवाद साधणे आणि राज्य शासन व राज्य स्तरीय सल्लागार मंडळाने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करणे याकरिता जिल्हा सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्हा सल्लागार मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **(१) बाल कल्याण क्षेत्रातील विख्यात सामाजिक कार्यकर्ता** | **- अध्यक्ष (अशासकीय सदस्य)** |
| (२) पोलीस आयुक्तांचा प्रतिनिधी किंवा पोलीस अधीक्षक | - सदस्य |
| (३) जिल्हा आरोग्य अधिकारी | - सदस्य |
| **(४) स्वयंसेवी संघटनेचा प्रतिनिधी** | **- सदस्य (अशासकीय सदस्य)** |
| (५) मंडळाचा सदस्य | - सदस्य |
| (६) समितीचा सदस्य | - सदस्य |
| (७) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | - सदस्य सचिव |

**राज्य व जिल्हा सल्लागार मंडळाच्या कामकाजाचे स्वरुप व अनुज्ञेय भत्ते--**

सदर सल्लागार मंडळांना तीन महिन्यातून किमान एक बैठक आयोजित करणे बंधनकारक आहे. तसेच सदर सल्लागार मंडळे ही बालगृहांकरिता तपासणी समिती म्हणून सुध्दा कार्य करीत असल्याने त्यांना आवश्यकतेनुसार बालगृह व इतर संस्थांना भेटी देण्याची आवश्यकता भासते. तसेच प्रसंगानुरुप आवश्यकतेनुसार सदर मंडळांना अतिरिक्त बैठका घ्याव्या लागतात.

याकरिता सदर सल्लागार मंडळ सदस्यांना महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.३१ ऑक्टोबर, २००३ व शासन निर्णय दि.२७ मार्च, २००३ अन्वये शासनाने विहित केल्यानुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय आहे. या व्यतिरिक्त कुठलेही वेतन, मानधन अथवा भत्ते अनुज्ञेय नाहीत.

**(३) बाल कल्याण समिती**

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी एक अशा ३५ जिल्हयांत बाल कल्याण समितीची स्थापना केली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत बाल कल्याण समितीची सर्व मुलांच्या काळजी व संरक्षणाकरिता एक कार्यक्षम व्यवस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. बाल कल्याण समितीत एक अध्यक्ष व ४ सदस्य असतात, त्यातील किमान एक सदस्य महिला असते, सदर पाच सदस्य हे बाल विकास क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांमधून निवडले जातात.सदर बाल कल्याण समिती दंडाधिकाऱ्यांचे न्यायपीठ म्हणून कायद्यातील तरतुदीनुसार कार्य पहाते. बाल कल्याण समितीकडे मुलांची काळजी, संरक्षण व पुनर्वसनाबाबत प्रकरणे निकालात काढण्याचे अंतिम अधिकार आहेत.

**(४) बाल न्याय मंडळ**

महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी एक अशा ३५ जिल्हयांत बाल न्याय मंडळांची स्थापना केली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम, २००० या कायद्यांतर्गत सदर बाल न्याय मंडळाची विधी संघर्षग्रस्त बालकांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता स्थापना करण्यात आली आहे. सदर मंडळात महानगर दंडाधिकारी किंवा यथास्थिती प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आणि दोन सामाजिक कार्यकर्ते असतात. त्यापैकी किमान एक महिला सदस्य असते. सदर सामाजिक कार्यकर्त्यांना मुलांच्या संबंधातील आरोग्य, शिक्षण किंवा कल्याण कार्यक्रम यात किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. सदर मंडळ हे दंडाधिकाऱ्यांचे एक न्यायपीठ म्हणून कायद्यातील तरतुदीनुसार कार्य पहाते.

**बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळांच्या कामकाजाचे स्वरुप व अनुज्ञेय भत्ते.**

बाल कल्याग समितीपुढे येणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या प्रकरणांचे प्रमाण/ व बाल न्याय मंडळापुढे येणाऱ्या विधी संघर्षग्रस्त बालकांच्या प्रकरणांच्या प्रमाणानुसार सदर समिती किंवा मंडळाला आठवडयाला साधारण २ ते ३ (आवश्कतेनुसार कमी जास्त ) बैठका घ्याव्या लागतात. तसेच आवश्यकतेनुसार अनाथ व निराश्रित बालकांच्या संस्थांना भेटी द्याव्या लागतात.

याकरिता बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष / सदस्य यांना प्रती बैठक रु.५००/-इतका बैठक भत्ता व शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २००४ अन्वये शासनाने विहित